मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत

# सहाय्यक पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग.

Email Add:- acp.mirard.mb-vv@mahapolice.gov.in

क्र.सपोआ/जाहिरनामा प्रसिध्दी/अ.मृ./४४२२/२०२५ — दि.२२.०९.२०२५.

मिरा - ... लिका।
दाखल ता. 26/9/2025
आयुक्त मि. भा. व.व.पा

वाचले :-

१. फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ (१९७४ चा २) च्या कलम २१ तसेच भारतीय नागरीक सुरक्षा संहिता-२०२३ चे कलम १५ मधील तरतूदीनूसार,
२. महाराष्ट्र शासन,गृह विभाग,यांचेकडील अधिसुचना-क्र.पीआरओ-०९२०/प्र.क्र.२१७/विशा-२,दि.११ ऑक्टो.२०२०,
३. महाराष्ट्र शासन,गृहविभाग यांचेकडील सर्वसाधारण क्र.१६१/२०२४ दि.१० सप्टेंबर २०२४.
४. मा.अपर पोलीस आयुक्त,मि.भा.व.वि.पो.आयुक्तालय,यांचेकडील क्र.अपोआ/पो.आ.अधि.प्र./१४२/२०२०,दि.१२ नोव्हें.२०२०,
५. मा.पोलीस आयुक्त,मि.भा.व.वि.पो.आयुक्तालय,यांचेकडील क्र.पोआ-मिभाववि/अक.मृत्यु.क्रिप्रोको.१७४/१७८/२३ दि.२६.०७.२०२३.

## -: जाहिरनामा क्र.१७/२०२५ :-

सदर जाहीर नोटीसद्वारे जनतेस आवाहन करण्यात येते की, मिरारोड उपविभागाअंतर्गत काशिमीरा, काशिगांव व मिरारोड पो.ठाणे आहेत. संबधीत पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांचेकडून फौजदारी प्रक्रिया संहिता-१९७३ चे कलम १७४ तसेच भारतीय नागरीक सुरक्षा संहिता-२०२३ चे कलम १९४ नुसार दाखल अकस्मात मृत्युमधील मयत व्यक्तीच्या मृत्यूच्या दर्शनी कारणांचा अहवाल या कार्यालयास प्राप्त झाला आहे.

पोलीस ठाण्याकडून फौजदारी प्रक्रिया संहिता-१९७३ चे कलम १७४ तसेच भारतीय नागरीक सुरक्षा संहिता-२०२३ चे कलम १९४ नुसार प्राप्त झालेल्या अकस्मात मृत्युमधील मयत व्यक्तीचे मृत्युचे कारण दर्शविणारे व चौकशी करणेबाबतचे अधिकार फौजदारी प्रक्रिया संहिता-१९७३ चे कलम १७६(२) तसेच भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम १९६ नुसार या कार्यालयास प्राप्त झाले आहेत व त्याबाबत चौकशी सुरु आहे.

दि.०१.०९.२०२५ ते दि.२१.०९.२०२५ दरम्यान इकडील कार्यालयात प्राप्त प्रकरणानूसार मयत इसमांची यादी मृतकांच्या मृत्यूचे कारण व नातेवाईक/खबर देणाऱ्यांच्या नांवासह खालील तक्त्यात नमूद केलेली आहेत.

| क्र. | आ.क्र. | पो.ठाणे | अ.मृ.क्र. | मयताचे नांव | वय/वर्षे | मृत्यूचे कारण | नातेवाईक/खबर देणार नांव | मृत्यूचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | १८२० १८.०९.२५ | काशिगांव | ४१/२०२५ | बिलाल जलील शेख | ४२ | काविळ | शारूख फिरोज सय्यद | नैसर्गिक |
| २. | १८२१ १९.०९.२५ | काशिमीरा | ३६/२०२५ | हितेश रमेश शिंपी | ३५ | गळफास | मृणालीनी रमेश शिंपी | अनैसर्गिक |
| ३. | १८४० २०.०९.२५ | काशिमीरा | ३२/२०२५ | वैभव हरिचंद्र चिम | २१ | गळफास | सौ.वनमाला हरिचंद्र चिम | अनैसर्गिक |
| ४. | १७७५ ०१.०९.२५ | मिरारोड | ३२/२०२२ | जमीदार रामदुलारे सिंह | ५६ | हृदयविकार | प्रज्वलकुमार जमीदार सिंह | नैसर्गिक |
| ५. | १८४३ २२.०९.२५ | मिरारोड | ४२/२०२१ | राघवेंद्र विनोद मिश्रा | २१ | कोविड-१९ फुफ्फुसाचा आजार | विनोद भवानीभिक मिश्रा | नैसर्गिक |

फौजदारी प्रक्रिया संहिता-१९७३ चे कलम १७६(२)(४) तसेच भारतीय नागरीक सुरक्षा संहिता-२०२३ चे कलम १९४ नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन उक्त नमूद मयत इसमांच्या मृत्यूच्या कारणाबाबत मयत व्यक्तीचे मृत्यूचे कारण दर्शविणारे आदेश व चौकशी करणे प्रस्तावित आहे.

कृपया मागे पहावे.२/-

मागील पानावरून-

तरी संबंधीत मयत इसमांच्या मृत्यूबाबत त्यांचे नातेवाईक,हितसंबंधीत अथवा अन्य कोणासही संशय/तक्रार/हरकत असल्यास याबाबतचे म्हणणे किंवा त्याबाबतचे पुरावे/साक्ष देणेची असल्यास संबंधीतांनी हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून ०५ दिवसाचे आत सहाय्यक पोलीस आयुक्त यांचे कार्यालय,मिरारोड विभाग पत्ता:-मिरारोड पो.ठाणे इमारत,दुसरा मजला,मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे.पीन-४०११०७ येथे कार्यालयीन वेळेत हजर राहून आपले म्हणणे तोंडी अथवा लेखी स्वरुपात सादर करावे असे आवाहन जाहीर नोटीसद्वारे जनतेस करण्यात येत आहे.

विहीत मुदतीत कोणाच्याही हरकती/तक्रार प्राप्त न झाल्यास या संदर्भात कोणाचीही हरकत नसल्याचे गृहीत धरून अकस्मात मृत्यू समरी मंजूरीचे आदेश निर्गमीत करण्यात येतील.

(गणपत पिंगळे)
सहाय्यक पोलीस आयुक्त,
मिरारोड विभाग.

प्रति,

१. प्रभारी अधिकारी,
काशिमीरा, मिरारोड, काशिगांव पो.ठाणे

२/- जाहीरनामा आपले पोलीस ठाणे नोटीस बोर्ड, बीट चौकी, वृत्तपत्र व इतर ठिकाणी प्रसिध्द करुन मृतकाचे नातेवाईकांना अवगत करावे.

२. तलाठी सजा,
नवघर, घोडबंदर, काशिगांव.

२/- सदर जाहीरनामा आपले कार्यालयाचे नोटीस बोर्ड/दर्शनी भागावर प्रसिध्द करावा.

**प्रत सादर,**

१. मा.उपायुक्त,(मुख्यालय),मिरा-भाईंदर महानगरपालिका,भाईंदर प. (नोटीस बोर्डवर प्रसिध्दीकरीता)
२. जिल्हा माहीती अधिकारी,ठाणे यांना वृत्तपत्रामध्ये प्रसिध्दीसाठी.
३. कार्यालयीन अधीक्षक,मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांना पोलीस राजपत्रामध्ये प्रसिध्दीसाठी.(ईऑफिस)
४. मिरा-भाईंदर महानगरपालीका पत्रकार कक्ष (प्रसिध्दीकरीता)
५. नस्तीकरीता.